## बिनतारी संदेश

प्रति :- सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी, बुलढाणा जिल्हा.

माहितीस :- अपर पोलीस अधिक्षक, खामगांव/बुलढाणा, सर्व उपविपो.अधि. बुलढाणा जिल्हा.

कडुन :- पोलीस अधीक्षक, बुलढाणा

क्रमांक : जिविशा /का.व सु./ ३७ (१) (३) / प्रसिद्धी/ खबरदारी /२०२५- 2334 दि. ०४/०४/२०२५

मा. जिल्हा दंडाधिकारी, बुलढाणा यांचेकडील आदेश क्र.गृहविभाग/कक्ष ४-२/कावि/११५/२०२५ दि.०४/०४/२०२५ अन्वये कलम ३७ (१) (३) मुं.पो.का. दि.०७/०४/२०२५ चे सकाळी ०६.०० वा. पासुन ते दि. २१/०४/२०२५ चे २४.०० वा. पावेतो (दोन्ही दिवस धरुन) संपुर्ण बुलढाणा जिल्हयात लागु करण्यात आला आहे. तरी सर्व ठाणेदार यांनी सदरहु प्रतिबंधात्मक आदेशाची आपले पोलीस स्टेशन हद्दीत व्यापक / प्रसिध्दी करावी व त्याबाबत पोलीस स्टेशनचे स्टेशन डायरीला नोंद घ्यावी.

५.४.२५

**( सुनिल अंबुलकर )**
पोलीस निरीक्षक जि.वि.शा.
पोलीस अधीक्षक बुलढाणा, करीता

Scanned with OKEN Scanner

## मुंबई पोलीस कायदा,१९५१ चे कलम ३७ (१) अन्वये अधिसूचना
## व कलम ३७(३) अन्वये आदेश.

---

क्रमांक/गृहविभाग कक्ष4-2/कावि/ 115/2025 दिनांक :- ०५/04/2025

---

पो.नि.जिविशा,बुलढाणा यांचे पत्र क्र.जिविशा/कावसु/क्र.37(1)(3)/2025-2303 दि. 03/04/2025 नुसार जवळच्या काळात घडलेल्या जातीय घटना/राजकिय घडामोडी,निवडणूका,सण,उत्सव मेळावे/या बाबी लक्षात घेता जिल्ह्यातील शांतता व सुरक्षीततेमध्ये बाधा निर्माण होऊन सार्वजनिक शांतता व सुरक्षीतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही,म्हणून दक्षता बाळगणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता जिल्हयात कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता व सुरक्षीतता अबाधीत राहावी या दृष्टीने सुरक्षीततेची उपाययोजना म्हणून मी,अपर जिल्हादंडाधिकारी,बुलढाणा,मुंबई पोलीस कायदा,1951 चे कलम 37(1) व कलम 37(3) अन्वये मला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन सदर अधिसुचना व आदेशानुसार खालील प्रकारास बंदी घालीत आहे.

### मुंबई पोलीस कायदा,1951 चे कलम 37 (1) अन्वये अधिसुचना

1) शस्त्रे,सोटे,तलवारी,भाले,दंडे,बंदुका,सुरे,काठया किंवा लाठया किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे,

2) विस्फोटकाच्या कच्च्या मालाची वाहतूक करणे,

3) दगड, विटा किंवा इतर क्षेपणास्त्राची वाहतूक करणे वा एकत्र जमा करुन ठेवणे.

4) जमावांचे, माणसांचे एकत्रिकरण करणे, व पुतळयांचे प्रदर्शन करणे,

5) जाहिररित्या ओरडणे,गाणे म्हणणे वा संगीत वाजविणे,

6) बिभत्सचाळे करणे, अंगविक्षेपण करणे, चित्रविचित्र कृती करणे, ज्यामुळे चांगुलपणा चारित्र्य हनन होऊ शकेल अशी कृती करणे,

### मुंबई पोलीस कायदा,1951 चे कलम 37 (3) अन्वये आदेश.

मी अपर जिल्हादंडाधिकारी,बुलढाणा कोणत्याही प्रकारच्या मानवी मेळाव्यास मिरवणूकीस कोणत्याही ठिकाणी (खाजगी जागेसह) आयोजित करण्यामुळे मिरवणूक काढल्यामुळे सार्वजनिक शांतता व सुरक्षीततेसाठी धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन निर्बंध घालीत आहे.

2) विस्फोटकाच्या कच्च्या मालाची वाहतूक करणे,

स्थानिक ठाणेदाराची परवानगी प्राप्त केल्यानंतरच अशा प्रकारचे आयोजन करता येईल. अशी परवानगी देण्या अगोदर ठाणेदार यांनी सबंधीत उपविभागीय दंडाधिकारी अथवा तालुका दंडाधिकारी यांचेशी चर्चा करणे अत्यंत गरजेचे आहे.

मुंबई पोलीस कायदा,1951 चे कलम 37(1) अन्वये जारी केलेली अधिसुचना व कलम 37(3) अन्वये जारी केलेला आदेश दिनांक 07/04/2025 च्या सकाळी 6.00 वाजेपासून ते दिनांक 21/04/2025 च्या 24.00 वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) संपूर्ण बुलढाणा जिल्हयाकरीता लागू करण्यात येत आहे.

मुंबई पोलीस कायदा,1951चे कलम 37 (1) अन्वये जारी केलेल्या अधिसुचनेचे उल्लंघन केल्यास मुंबई पोलीस कायदा, 1951 चे कलम 135 (1) व 37(2) अन्वये कार्यवाही करण्यात येईल. तसेच कलम 37(3) अन्वये जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास मु.पो.का.1951 चे कलम 35(III) अन्वये कार्यवाही करण्यात

"...2

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

येईल. उपरोक्त आदेश कामावरील शासकीय/ निमशासकीय कर्मचारी,लग्न,अंत्ययात्रा,नाटक,सांस्कृतीक कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम,शासकीय कार्यक्रम, आणि आठवडी बाजार यांना लागू राहणार नाही.अंत्ययात्रेच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मिरवणूका रस्त्यावरून ओळीमधून नेण्यासाठी स्थानिक ठाणेदाराची लेखी परवानगी घेणे अत्यावश्यक राहील.

सदर आदेश आज दिनांक ०५ /04/2025 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

-सही/-
(समाधान गायकवाड)
अपर जिल्हादंडाधिकारी,
बुलढाणा

DISTRICT MAGISTRATE
सत्यमेव जयते
BULDANA (M.S.)

प्रतिलिपी -

1) पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांना संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषीत.
2) जिल्हा माहिती अधिकारी,बुलढाणा यांना माहिती तथा दैनिक वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यासाठी अग्रेषीत.
3) उपविभागीय दंडाधिकारी, बुलढाणा /सिंदखेडराजा/ मेहकर/ खामगांव /जळगांव जामोद / मलकापूर यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.
4) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी बुलढाणा /चिखली /दे.रोजा /सिं.राजा /मेहकर/ लोणार / खामगांव /शेगांव/जळगांव जा /संग्रामपूर/ मलकापूर /नांदूरा /मोताळा यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषीत.सदर आदेश नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
5) जिल्हा नाझर,जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा सदर आदेश नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द करण्यास्तव अग्रेषित.

अपर जिल्हादंडाधिकारी,
बुलढाणा

Scanned with OKEN Scanner